## निशाणी क्र.०१ वरील आदेश

अर्जदार शंकर मारोती गावंडे यांनी सदरचा अर्ज हा ते मयत शांताबाई मारोती गावंडे यांचे वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. मयत शांताबाई मारोती गावंडे यांचे अर्जदार क्र.१) शंकर मारोती गावंडे हा मुलगा आहे. अर्जदार क्र.२) निर्मला नारायणराव गावंडे हि सुन आहे. तसेच अर्जदार क्र.३) दत्तात्रय नारायणराव गावंडे, अर्जदार क्र.५) निलेश नाराणराव गावंडे, अर्जदार क्र.६) नितीन नारायणराव गावंडे हे नातु आहेत. तसेच अर्जदार क्र.४) विद्या विकास ठाकरे व अर्जदार क्र.७) वैशाली किशोर वानखडे ह्या विवाहित नातिण आहेत.

३. मयत शांताबाई मारोती गावंडे यांचा मृत्यु दिनांक ०६/०८/२००५ रोजी लोणी येथे झालेला आहे. मयत शांताबाई मारोती गावंडे यांचे वारस दाखल्याची अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व इतर महत्वाचे कामासाठी आवश्यकता लागणार आहे. सबब त्यांचे पश्चात अर्जदार हे त्यांचे वारस असल्याचा दाखला मिळण्यासाठी त्यांनी प्रस्तूतचा अर्ज केला आहे.

४. अर्जदार यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.७ वर आहे, मयत शांताबाई मारोती गावंडे यांच्या मृत्यू दाखल्याची साक्षांकीत प्रत नि.१० वर आहे. मयत नारायण यांच्या मृत्यू दाखल्याची साक्षांकीत प्रत नि.११ वर आहे. अर्जदार यांच्या आधार ओळखपत्राची साक्षांकित प्रत नि.क्र.१२ ते १८ वर आहे. अर्जदारांच्या नावे वारस दाखला देण्यास कुणाची हरकत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी स्थानिक वृत्तपत्र "यवतमाळ मार्मीक" मध्ये दि.२३/०२/२०२६ रोजी नोटीस प्रसिध्द करण्यात आली. ती निशाणी १९ वर आहे, तसेच जाहीरनामा नि.६ प्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेला आहे. परंतु मुदतीत अर्जदारांच्या नावे वारस दाखला देण्यास कोणीही हरकत घेतली नसल्याचे दिसून आले.

**५.** अर्जदारांचा अर्ज, त्यांचे मयताशी असलेले नाते संबंध, तसेच त्यांनी दाखल केलेले कागदोपत्री पुरावे व शपथपत्र, विचारात घेऊन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

## <u>आ दे श</u>

**१)** अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२)** अर्जदार अर्जदार क्र.१) शंकर मारोती गावंडे, अर्जदार क्र.२) निर्मला नारायणराव गावंडे, अर्जदार क्र.३) दत्तात्रय नारायणराव गावंडे, अर्जदार क्र.४) विद्या विकास ठाकरे, अर्जदार क्र.५) निलेश नाराणराव गावंडे, अर्जदार क्र.६) नितीन नारायणराव गावंडे, अर्जदार क्र.७) वैशाली किशोर वानखडे हे मयत शांताबाई मारोती गावंडे यांचे वारस असल्याचा दाखला योग्य ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर त्यांना देण्यात यावा.

**३)** अर्जदाराने ज्या कारणासाठी दाखला मागितलेला आहे केवळ त्याच कारणासाठी त्याचा उपयोग करता येईल. वारस दाखल्यान्वये कोणत्याही मिळकतीचा मालकी हक्क ठरवून मिळत नाहीत.

**४)** सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधिन राहून देण्यात येत आहे.

स्वा/-

ठिकाणी:- आर्णी
दि.१०/०४/२०२६

**(रोशनी दिपक चौबे)**
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
आर्णी